माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : ४६/२०२१**

**तक्रारकर्ता, श्री. अनिल नारायणदास सारडा,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, गो.से.अर्थ व वाणिज्य महाविद्यालय,**
लॉ कॉलेज चौक, अमरावती रोड, नागपूर

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा गो.से.अर्थ व वाणिज्य महाविद्यालय,**
लॉ कॉलेज चौक, अमरावती रोड, नागपूर

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : १९.०७.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारकर्ता** | : | अनुपस्थित |
| **जन माहिती अधिकारी** | : | उपस्थित |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | अनुपस्थित |

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| ३१.०७.२०२० | --- | २४.०२.२०२१ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. १८९८/२०१९, १८९९/२०१९, १९००/२०१९, १९०१/२०१९, १९०२/२०१९ मध्ये दिनांक ३१.०७.२०२० रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक १९.०७.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी प्राचार्य, गो.से.अर्थ वाणिज्य महाविद्यालय, सिव्हील लाईन्स, नागपूर , डॉ. स्वाती कठाळे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षा मंडळ, वर्धा श्री. संजय भार्गव अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. १८९८/२०१९, १८९९/२०१९, १९००/२०१९, १९०१/२०१९, १९०२/२०१९ मध्ये दिनांक ३१.०७.२०२० रोजी सुनावणी घेवून " १. प्रस्तुत प्रकरणी विभागीय चौकशी पुर्ण होण्याची वाट न पाहता अपिलकर्ता यांनी माहिती अधिकारातंग्रर्गत जोडपत्र-अ अन्वये, मागितलेली माहिती जनमाहिती अधिकाऱ्यांनी तात्काळ अपिलार्थीस विनामुल्य पुरवून त्याची पोहच आयोगास सादर करावी,

२. केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (१०) नुसार राज्य माहिती आयोगाने पारित केलेला प्रत्येक आदेश कलम १९ (७) नुसार संबंधित सार्वजनिक प्राधिकरणावर निर्धारित वेळेत अनुपालन करण्यासाठी अंतिम व बंधनकारक आहे. जर पारित आदेशाचे अनुपालन न करून अवमान केल्यास प्राधिकरणाचे संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १६६ नुसार फौजदारी कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी," असे आदेशीत करुन प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक २३.०२.२०२१ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपिलार्थी यांनी द्वितीय अपील क्र. १८९८/२०१९, १८९९/२०१९, १९००/२०१९, १९०१/२०१९ व १९०२/२०१९ मध्ये दिनांक ३१.०७.२०२० रोजी पारित आदेशानुषंगाने अपिलार्थी, श्री. सारडा यांना त्यांच्याविरुध्द सुरु असलेली विभागीय चौकशी पूर्ण होण्याची वाट न पाहता, अपिलकर्ता यांनी माहिती अधिकारातंर्गत जोडपत्र-अ अन्वये, मागितलेली माहिती जनमाहिती अधिकाऱ्यांनी तात्काळ अपिलार्थीस विनामुल्य पुरवून त्याची पोहच आयोगास सादर करावी, असे दि. ३१.०७.२०२० रोजी झालेल्या सुनावणीत आदेशित करण्यात आले. वरील आदेश प्रत्यक्षात दि. २५.०१.२०२१ रोजी निर्गमित करण्यात आला.

तत्कालिन जनमाहिती अधिकारी यांच्यावतीने व्दितीय अपिल आदेश प्राप्त होताच अपिलार्थी यांना दि. ०४.०२.२०२१ रोजी ५ ही अपिल अर्जातील जोडपत्र-अ प्रमाणे पुनश्च: एकदा माहिती प्रदान करण्यात आली आहे. परंतु अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, गो.से.अर्थ वाणिज्य महाविद्यालय, नागपूर यांच्याकडून मिळालेली माहिती चूकीची अपूर्ण असल्याचे दि. ११.०२.२०२१ रोजी पत्र पाठविले. महाविद्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना पुरविली असल्याचे जनमाहिती अधिकारी यांच्या कागदपत्रावरून आढळून येते. तसेच तत्कालिन जनमाहिती अधिकारी यांनी याबाबत पुर्नउच्चार केला असल्याचे आढळून येते. तत्कालिन जनमाहिती अधिकारी, श्री. खंडाईत यांनी दि. १६.०२.२०२१ रोजी अपिलार्थी यांना माहिती अर्जाप्रमाणे महाविद्यालयाच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात आलेली आहे, असे कळविले आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

आज तक्रार सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित असून महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य, गो.से.अर्थ वाणिज्य महाविद्यालय, नागपूर उपस्थित आहे. अपिलार्थी यांना प्राधिकरणाच्या वतीने कलम २ च प्रमाणे देय माहिती पुरविण्यात आली. कलम ८ (१) (त्र) नुसार जी माहिती प्रदान करणे अपेक्षित होती ती माहिती पुरविण्यात आली आहे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये कलम ८ (१) (h) नुसार जी माहिती पुरविणे बंधनकारक नाही ती माहिती पुरविण्यात आली नाही. मा. केंद्रीय माहिती आयोग यांनी H.K. Bansal - Vs – Department of Telecommunication, New Delhi, याचा दाखला देत अपिलार्थी यांना त्यांच्या विभागीय चौकशी संबंधित व महाविद्यालयासंबधी माहिती प्रदान केली आहे. महाविद्यालयाशी संबंधित कायदे, नियम, ठरावाच्या प्रती प्रदान केल्या असून तक्रारकर्ता यांनी केलेली तक्रार तथ्यहीन असून फेटाळण्यात यावी. त्यांच्या चौकशी संबंधी सर्व कागदपत्रे कालबाह्य झाले असल्याने प्रकरण निकाली काढावी, अशी विनंती महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी अपूर्ण माहिती प्रदान केल्याचा आक्षेप नोंदविला असून कागदपत्र सादर केली नाही याबाबत त्यांनी कुठलेच भाष्य केले नाही. आयोगाने पारित केलेल्या आदेशाचे जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, गो.से.अर्थ वाणिज्य महाविद्यालय, नागपूर यांनी अनुपालन केले असल्याची बाब लक्षात घेता, जी माहिती कलम २ च प्रमाणे प्रदान करणे बंधनकारक आहे. ती सर्वच माहिती अपिलार्थी यांना याआधीच पुरविलेली असल्याने प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढणे योग्य ठरेल, या निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण :** नागपूर
**दिनांक :** १९.०७.२०२३

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
★ नागपूर ★

जा.क्र. 6424 दि. 30 NOV 2023